**नियमीत दिवाणी दावा नं. १७३/२०२३ मधील नि. २१ खालील आदेश**

**CNR : MHSN06001537-2023**

**(श्री. श्रीदर्शन कवठेकर वि. सौ.अनिता पाटील आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द मालकी हक्कावरुन अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळणेकरिता दावा दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी नं.०१ ते ०४ हे दि.०९.०२.२०२४ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी नं.०१ ते ०४ हया महिला असून, प्रतिवादी नं.०३ व ०४ हया वयोवृध्द महिला आहेत. सदर कामी कैफियत देणेकरिता प्रतिवादी यांना मुदतीत कागदपत्री व माहिती उपलब्ध झालेली नाही. प्रतिवादी नं.०१ व ०२ यांच्या घरगुती अडचणींमुळे तसेच प्रतिवादी क्र.०३ व ०४ यांच्या वयोमानानुसार आजारी असल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. कैफियत दाखल करणेस झालेला विलंब हा सदर कारणांमुळे झालेला आहे. न्यायाच्या दृष्टीने व गुणावगुणावर अंतिम निकाल होणेसाठी कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादीं विरुध्द "विना कैफियत" असा झालेला आदेश रद्द करुन, झालेला विलंब माफ करुन प्रतिवादींचे वादीच्या दावेस कैफियत दाखल करणेस परवानगी असावी अशी विनंती करतात.

**०२.** वादी यांनी प्रतिवादी नं.०१ ते ०४ यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे. सदर अर्जातील संपूर्ण कथने खोटी, चुकीची व लबाडीची असून ती सदर वादीस मान्य व कबूल नाहीत. सदर प्रतिवदी यांना किती दिवसांचा विलंब झालेला आहे हे कुठेही नमुद केले नाही. प्रतिवादी यांनी म्हणणे व कैफियत देणेकरिता केलेला विलंब हा जाणूनबुजून केलेला आहे. प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत या वा अशी विनंती करतात.

**०३.** सदर कामी अभिलेखाचे अवलोकन केले असता, तसेच दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रतिवादी यांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणांचा विचार करता सदरकामी अंतिम न्यायनिर्णया करिता प्रतिवादी यांची कैफियत दाखल करणे आवश्यक ठरणार आहे. प्रतिवादी यांनी कथन केलेले वरील कारण पुरसे व न्यायीक असल्याचे दिसून येत आहे. झालेला उशीर हा विचारात घेता दावा हा नैसर्गिक न्यायतत्वांच्या गुणदोषावर चालण्यासाठी प्रतिवादींची कैफियत व म्हणणे विचारात घेणे न्यायोचीत वाटत आहे. झालेल्या उशीराबाबत तसेच खर्चाच्या रक्कमेबाबत आदेश करणे मला न्यायोचीत वाटत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** सदरचा अर्ज मंजुर करणेत येतो.

**०२.** प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला "विना कैफियत" आदेश रद्द करणेत येतो.

**०३.** प्रतिवादी यांना म्हणणे व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब खर्चाची रक्कम रुपये ५००/-(र.रु.पाचशे मात्र) वर मंजुर करण्यात येतो. सदरची खर्चाची रक्कम ही वादी यांना देणेत यावी.

ANIRUDHA SUNIL RANE
Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2024.09.21 15:12:54 +0530

**(श्री. ए. एस. राणे)**

**दि.२१.०९.२०२४** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 21/09/2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 21/09/2024 |
| **Judgment/Order uploaded on** | **:** | **21/09/2024** |